|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पुर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ)

'A'Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

**विद्यार्थी विकास व राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

जा.क्र. कबचौउमवि/१४/वि.वि-रासेयो/कार्यशाळा/३६९/२०१८ दि.०४/१०/२०१८

**प्रति,**

**मा. प्राचार्य / संचालक/ विभाग प्रमुख,**

**कबचौउत्तर महाराष्ट्र विद्यापीठ कार्यरत महाविद्यालये, मान्यता प्राप्त परिसंस्था व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग**

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील रासेयो व विद्यार्थी विकास कार्यशाळेस उपस्थितीबाबत ..**

महोदय,

शिक्षण संचालक , उच्च शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण रासेयो कक्ष, यांचे पत्रान्वये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त आयोजित विविध कार्यक्रमाच्या आढावा घेणे आणि युवा माहिती दुत अभियान राबविणे आदि उपक्रम सुचविले आहेत.

प्रस्तुत अनुषंगाने आपणास सुचित करण्यात येते की, विद्यापीठ परीक्षेत्रातील महाविद्यालयात सदरच्या कार्यक्रमाची योग्य ती अमंलबजावणी होणेसाठी झालेल्या उपक्रमाच्या अहवाल एकत्रितकरणेसाठी विद्यार्थी विकास व राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा व विभागीय समन्वयक तसेच विद्यार्थी विकास अधिकारी आणि कार्यक्रम अधिकारी यांची एकत्रित कार्यशाळा **विद्यापीठाचे कुलगुरु, मा.प्रा.पी.पी.पाटील** यांच्या अध्यक्षतेखाली **दि. १० ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता विद्यापीठ अधिसभागृहात** आयोजित करण्यात येत आहे. प्रस्तुत कार्यशाळेत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त आयोजित विविध कार्यक्रमाच्या आढावा घेणे, युवा माहिती दुत नेमणूक व विद्यार्थी विकास व रासेयो संदर्भात राबविण्यात येणारे विविध उपक्रम, सांख्यिकी माहिती, चर्चेव्दारे नियोजन करण्यात येणार आहे. तसेच सन २०१८-१९ मध्ये विद्यापीठस्तरीय विविध पुरस्कार प्राप्तकर्तांच्या व विविध शिबीरांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या व पुरस्कार प्राप्त केलेल्याच्या सत्कार या प्रसंगी करण्यात येणार आहे.

आपणास कळविण्यात येते की, आपल्या विद्यार्थी विकास अधिकारी, रासेयो एकक कार्यक्रम अधिकारी, जिल्हा विद्यार्थी विकास समन्वयक, रासेयो जिल्हा व विभागीय समन्वयक यांना प्रस्तुत सभेस उपस्थित राहणे आवश्यक असल्याने त्यांना दि. १० ऑक्टोबर , २०१८ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यत सभा स्थळी उपस्थित राहण्याविषयी सूचीत करावे. कृपया, त्यांना उपस्थितीकरीता कर्तव्य रजा मंजूर करावी, त्यांचा सभेला येण्या जाण्याचा प्रवास खर्च रा.से.यो. नियमित कार्यक्रम अनुदानातून भागवावा ही विनंती.

कृपया, संबंधितांसाठी चहापान, अल्पोपहार व दुपारच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

कळावे.

आपला विश्वासू,

(प्रा.एस.टी.इंगळे)
प्र.संचालक वि.वि.व रासेयो

**प्रत :-**

१) सहा.कुलसचिव मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि. जळगाव
२) उपकुलसचिव, मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि. जळगाव
३) मा. वित्त व लेखाधिकारी, कबचौउमवि, जळगाव
४) जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव — सदर पत्रकास प्रसिध्दी देण्यात यावी.
५) पध्दती विश्लेषक,संगणकशास्त्र प्रशाळा,कबचौउमवि जळगाव — सदर पत्रकास संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी.
६) कक्षअधिकारी, कुलसचिव कार्यालय,